Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२, अंक १४ ] गुरुवार ते बुधवार, एप्रिल १६-२२, २०२६/चैत्र २६-वैशाख २, शके १९४८ [पृष्ठे १८, किंमत : रुपये ८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—अमरावती विभागीय पुरवणी

**(भाग चार - ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ८९.

### संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

### अधिसूचना

क्रमांक अंतिम न.र.यो.वणी क्र.१-ता. वणी-जि.यवतमाळ-कलम-८६(१) (ख)-टिपीव्ही-६-११९०.—

ज्याअर्थी, वणी नगर परिषदेने त्यांच्याकडील पत्र क्र. १६४-२०२५, दिनांक ०६ मार्च, २०२५ अन्वये मंजुरीसाठी सादर केलेली प्रारुप नगर रचना योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त प्रारुप नगर रचना योजना " असा करण्यात आला आहे.) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांना शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ उप-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात उक्त अधिनियमाचे कलम ६८ उप-कलम (२) अन्वये अधिसूचना क्रमांक न. र. यो.-वणी-मंजुरी-कलम ६८ (२)-टीपीव्ही-६-१६७६, दिनांक २८ मार्च, २०२५ अन्वये मंजूर केलेली आहे.;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. न. र. यो.-वणी-लवाद-कलम ७२ (१)-टीपीव्ही-६-१९७०, दिनांक १७ एप्रिल, २०२५, अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ७२ उप-कलम (१) मधील तरतुदीनुसार व त्यांना शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ उप-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात श्री. मनोहर कि. नकाशे, निवृत्त सहायक संचालक, नगर रचना यांची उक्त नगर रचना योजनेसाठी लवाद म्हणून नेमणूक केली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त लवाद " असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त लवाद यांनी उक्त अधिनियमाचे कलम ७२ उप-कलम (३) व (४) मध्ये नमूद कार्यपध्दती नुसार, प्रारुप नगर रचना योजनेस अनुसरुन प्राथमिक नगर रचना योजना, वणी क्र. १ ची विहित नमुन्यात आखणी करुन प्राथमिक नगर रचना योजना, वणी क्र. १ उक्त अधिनियमाचे कलम ७२ उप-कलम (५) मधील तरतुदीनुसार दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्र क्र. २६ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मंजुरी करीता सादर केली आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांना शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ उप-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात उक्त अधिनियमाचे कलम ८६ उप-कलम (१) (क) अन्वये अधिसूचना क्र. प्राथमिक न. र. यो. वणी क्र. १, वणी-जि. यवतमाळ-कलम ८६ (१) (क)-टीपीव्ही-६-५७०६, दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ अन्वये प्राथमिक नगर रचना योजना, वणी क्र. १ मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त लवाद यांनी उक्त अधिनियमाचे कलम ७२ उप-कलम (३), (५), (६) व (७) मध्ये नमूद कार्यपध्दती नुसार प्रारुप नगर रचना योजनेस अनुसरुन अंतिम नगर रचना, वणी क्र. १ ची विहीत नमुन्यात आखणी केली आहे;

आणि ज्याअर्थी, लवाद यांनी उक्त नमूद योजनेसंदर्भात त्यांच्याकडे कोणतेही अपिल प्राप्त झाले नसल्यामुळे उक्त अधिनियमाच्या कलम ७५ मधील तरतुदीनुसार अपील न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात आलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त लवाद यांनी उक्त योजनेसंदर्भात आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन, उक्त अंतिम नगर रचना योजना, वणी क्र. १ उक्त अधिनियमाच्या कलम ७२ (५) व कलम ८२ (२) अनुसार पत्र क्र. ५६, दि. २८ जानेवारी, २०२६ अन्वये मंजुरीकरीता संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर केली आहे ; (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अंतिम नगर रचना योजना" असा करण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त लवाद यांनी सादर केलेली उक्त अंतिम नगर रचना योजना, प्राप्त झालेच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत कलम ८२ उप-कलम (१) (ख) अन्वये मंजूर करणे अथवा, नामंजूर करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र. क्र.५०८-नवि-१३, दिनांक १ डिसेंबर, २०१६ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार उक्त अधिनियमाच्या कलम ८६ उप-कलम (१) आणि (२) चे तरतुदीन्वये सर्व नगर परिषदा/नगर पंचायत क्षेत्रातील अंतिम नगर रचना योजना मंजूर करणेचे शासनाचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त अधिनियमाचे कलम १५१ उप-कलम (१) चे तरतुदीन्वये प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व विभागीय सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर उक्त अंतिम नगर रचना योजना, वणी क्र. १ मंजूर करणे आवश्यक आहे असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ८६ उप-कलम (१) (ख) बाबत प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे याद्वारे :-

(अ) अंतिम नगर रचना योजना, वणी क्र. १ उक्त लवादा यांनी प्रस्तावित केल्यानुसार कोणताही बदल न करता मंजूर करीत आहेत ;

(ब) उक्त मंजूर करण्यात आलेली अंतिम नगर रचना योजना, वणी क्र. १, मंजुरीची सदर अधिसूचना वणी नगर परिषद, कार्यालयामध्ये कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सहा महिन्याच्या कालावधीकरीता आम जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(क) अंतिम नगर रचना योजना वणी, क्र. १, च्या अधिप्रमाणित प्रती किंवा त्यातील संबंधित भागांच्या प्रती आम जनतेला अर्ज करुन माफक दरात विक्रीसाठी वणी, नगर परिषद कार्यालयामध्ये उपलब्ध ठेवण्यात येतील.

(ड) उक्त मंजूर करण्यात आलेली अंतिम नगर रचना योजना, वणी, क्र. १, व या योजनेद्वारे निर्माण झालेली दायित्वे ज्या दिनांकापासून अंमलात येतील ती तारीख १६ मार्च, २०२६ अशी निश्चित करण्यात येत आहे.

(इ) सदरची अधिसूचना खालील कार्यालयांमध्ये कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीकरीता आम जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) लवाद, नगर रचना योजना वणी क्र. ०१,नगर परिषद, वणी यांचे कार्यालय, जि. यवतमाळ.

(२) सहसंचालक नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.

(३) सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ.

(ई) सदरची अधिसूचना ही संचालनालयाच्या **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

पुणे :
दिनांक १० मार्च, २०२६.

**जितेंद ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

भाग १-अ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ९०.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*NOTIFICATION*

No. Final TPS Wani No.1-Tq. Wani-Dist. Yavatmal-Sec-86(1) (b)-TPV-6-1190.—

Whereas, the Draft Town Planning Scheme, Wani, No.1 submitted by the, Municipal Council, Wani *vide* its letter No. 164-2025, Dated 06th March, 2025 (hereinafter referred to as "the said Draft Scheme") has sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. Draft TPS No. 1- Wani-Tal. Wani, Dist. Yavatmal-Sec. 68 (2)-TPV- 6-1676, Dated 28th March, 2025 under sub-section *(2)* of the section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") as per the power delegated under section 151 *(1)* of the said Act;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. TPS-Wani-Arbitrator-Section 72(1)-TPV-6-1970, Dated 17th April, 2025, issued under sub-section *(1)* of section 72 of the said Act, has appointed Shri. Manohar K. Nakashe, Retired Assistant Director of Town Planning as the Arbitrator in respect of the said Draft Scheme (hereinafter referred to as "the said Arbitrator");

And whereas, the said Arbitrator, after following the prescribed procedure as required under sub-section *(3)* and *(4)* of section 72 of tht said Act, has drawn up in the prescribed form, the Preliminary Town Planning Scheme Wani, No. 1 in accordance with the said sanctioned Draft Scheme and submitted for sanction under sub-section *(5)* of section 72 of the said Act, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune for sanction *vide* lettier No. 26, Dated 18th August, 2025;

And whereas, the Preliminary Town Planning Scheme, Wani, No. 1 subimitted by the said Arbitrator has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *vide* Notification No. Preliminary TPS No. 1, Wani-Dist. Yavatmal-Sec. 86(1)(a)-TPV-6-5706, Dated 24th September, 2025 under sub-section *(1) (a)* of the section 86 of the said Act, as per the power delegated under section 151 *(1)* of the said Act;

And whereas, the said Arbitrator, after following the prescribed procedure as required under sub-section *(3), (5), (6)* and *(7)* of section 72 of the said Act, has drawn up in the prescribed form, the Final Town Planning Scheme, Wani, No. 1 in accordance with the said sanctioned Draft Scheme;

And whereas, since no appeal in respect of the aforesaid mentioned scheme has been received by the Arbitrator, the Tribunal of Appeal has not been constituted in accordance with the provisions of Section 75 of the said Act;

And whereas, the said Arbitrator as required under sub-section (5) of section 72 read with section 82 *(2)* of the said Act, forwarded the said Final Town Planning Scheme, Wani No. 1 to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune *for* sanction *vide* letter No. 56, Dated 28th January, 2026 (hereinafter referred to as "the said Final Town Planning Scheme");

And whereas, in accordance with the provisions of sub-section *(1) (b)* of section 86 of the said Act, the said Final Town Planning Scheme is required to be sanctioned or refused within a period of three months from the date of receipt of the said Final Town Planning Scheme from the Arbitrator under section *82 (1) (b)* of the said Act;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department *vide* it's Notification No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, Dated 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it, under section *86 (1)* and *(2)* of the said Act, the powers of the Government to sanction the Final Town Planning Scheme in respect of all Municipal Councils / Nagar Panchayat, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, in accordance with the provisions of Section 151, sub-section *(1)* of the said Act;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune after making necessary enquiries and after consulting the Joint Director of Town Planning, Amravati Division, Amravati is of the opinion that it is necessary to sanction the said Final Town Planning Scheme, Wani No. 1 as proposed without any modifications;

Now, therefore, in exercise of the powers delegated to him under sub-section *(1) (b)* of section 86 of the said Act, and all other powers enabling in this behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby :-

(a) Sanctions the said Final Town Planning Scheme, Wani No. 1 as proposed by the said Arbitrator without any modifications.

(b) Directs that, this Notification and the said Final Town Planning Scheme, Wani, No. 1 as sanctioned shall be kept open for inspection by the public for a period of six months during office hours on all working days in the Office of Municipal Council, Wani.

(c) Directs that, the copies of the said Final Scheme or extracts there from certified to be correct shall be available for sale to the public on application at a reasonable price at the Office of the Municipal Council, Wani and.

(d) Fixes 16th March, 2026 to be the date on which all the liabilities created shall take effect and the said Final Scheme *i.e.* Final Town Planning Scheme, Wani No. 1 as sanctioned shall come into force.

(e) This notification shall also be available for inspection of general publlic during office hours on all working days for the period of one month in the following offices :-

(i) Office of the Arbitrator, Town Planning Scheme, Wani No. 1, Wani, Dist. Yavatmal.

(ii) Joint Director of the Town Planning, Amravati Division, Amravati.

(iii) Assistant Director of Town Planning, Yavatmal Branch, Dist. Yavatmal.

(f) This notification is made available on the *www.dtp.maharashtra.gov.in* website of Director of Town Planning, Maharashtra State, Pune.

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 10th March, 2026.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिध्द झालेल्या आहेत.**

**११**

**सोमवार, जून २६, २०२५/आषाढ ५, शके १९४७**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २४.

## विभागीय आयुक्त, यांजकडून

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम १४५ पोट-कलम १(अ) नुसार निर्णय घेण्याचे राज्य शासनाचे अधिकार अधिसूचना क्र. व्हीपीए-१०८३-सीआर-१६७०-२१, दिनांक १ जून, १९८३ नुसार विभागीय आयुक्त यांना प्रदान करण्यात आल्यानुसार व राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्र. रानिआ-१०९६-प.क्र.२-९६-पंरा, दिनांक १५ जून, १९९६ व ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन परिपत्रक क्र. ग्रापंनि-२०१-प्र.क्र.५५-०६, दिनांक ३० जून, २००१ चे अनुषंगाने ग्रामपंचायत जवळा शहापूर, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती चा कालावधी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२६ रोजी संपुष्टात येत असून ग्रामपंचायतीचा उर्वरित कालावधी कमी शिल्लक आहे. सदर उर्वरित ग्रामपंचायत कालावधी पुढील निवडणूकीची पूर्ण प्रक्रिया राबविण्यामध्ये निघून जाऊ शकतो. या सर्व बाबी लक्षात घेता मी, डॉ. श्वेता सिंघल, भा.प्र.से. विभागीय आयुक्त खालीलप्रमाणे आदेश परित करीत आहे.

### आदेश

क्रमांक कक्ष-८-ग्रापंनि-स.म.अ.-कावि-८५-२०२५.—

१. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम १४५ (१-अ) नुसार ग्रामपंचायत जवळा शहापूर, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती चे विघटन करण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी विघटित ग्रामपंचायतीचे प्रशासक म्हणून विस्तार अधिकारी, पंचायत समिती, चांदूर बाजार यांची नेमणूक करावी.

सदर आदेश आज दिनांक १८ जून, २०२५ रोजी पारित करण्यात येत असून माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**डॉ. श्वेता सिंघल** (भा.प्र.से.),
विभागीय आयुक्त,
अमरावती.

अमरावती :
दिनांक १८ जून, २०२५.

**१२**

**सोमवार, जून ३०, २०२५/आषाढ ९, शके १९४७**

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २५.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये वणी (वाढीव हद्द) शहराच्या प्रारुप विकास योजनेचे प्रसिध्दीकरण**

**सूचना**

क्रमांक नपव-नि.वि.-वि.यो.वा.ह-६४७-२०२५.—

ज्याअर्थी, वणी नगर परिषदेने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील वाढीव हद्द क्षेत्राची (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली चे कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम २३ (१) मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, वणी (वा.ह.) (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना " असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ०१, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ अन्वये जाहीर करुन त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभाग, पुरवणी भाग-१-अ, मध्ये दिनांक ६ सप्टेंबर, २०२३ रोजी प्रसिध्द केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन नगर परिषद, वणी उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांची " नगर रचना अधिकारी " म्हणून आदेश क्र. १०२७-२०२३, दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ अन्वये नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६ (१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिध्द करण्यासाठी ठराव क्र. ०१, दिनांक २५ जून, २०२५ पारित केलेला आहे ;

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६ (१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.—

१. मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी.

२. सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ.

उक्त प्रारुप योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, नगर परिषद, वणी यांचेकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगर परिषद, वणीकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन नगर परिषद, वणी च्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

(अवाच्य),<br>
मुख्याधिकारी,<br>
नगर परिषद, वणी.

वणी :<br>
दिनांक २६ जून, २०२५.

---

भाग १-अ (असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २६.

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

**Publication of Draft Development Plan of Wani (Extended Boundary) Under Section 26*(1)* of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

*NOTICE*

No. MCW-P.S.-D.P.E.B.-647-2025.—

Whereas the Municipal Council, Wani (hereinafter referred to as “ the said Planning Authority ”) *vide* Resolution No. 01, Date 04th August, 2023 declared its intention to prepare a Draft Development Plan of Wani (Extended Boundary) For Municipal Council, Wani (hereinafter referred to as “ the said Draft Development Plan ”) for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as “ the said area ”) as per the provision of Section 23(*1*) read with Section 21(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “ the said Act ”) and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Amravati Division, Supplementary Part 1-A, on 6th September, 2023 ;

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Municipal Council, Wani *vide* Order No. 1027-2023, Dated 4th September, 2023 has appointed Assistant Director, Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal as “ Town Planning Officer ” to prepare the said Draft Development Pian for the said area;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director. Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on Dated 6th June, 2025 for Publication Under Section 26(*1*) of the said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 01, Dated 25th June, 2025 to publish the said Draft Development Plan under Section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/ objections from the public;

Therefore, Municipal Council, Wani hereby publishes the said Draft Development Plan along with the report under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.—

1. The Chief Officer, Municipal Council, Wani.

2. Assistant Director, Town Planning, Yavatmal Branch, Yavatmal.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief Officer, Municipal Council, Wani within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette*. Suggestions/objections received by the Municipal Council, Wani within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of the Municipal Council.

(Illegible),
Chief Officer,
Municipal Council, Wani.

Wani :
Dated the 26th June, 2025.

१३

**शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७**

भाग १-अ(असा.) (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २७.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५**

**अधिसूचना**

क्रमांक नपचि-सा.प्र.वि.-२५९२-२०२५–

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सेवा व्यापक लोकहिताच्या दृष्टीने लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्याबाबत नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९२२-प्र.क्र. ३२, दिनांक ०९ जानेवारी, २०२४ या शासन निर्णयान्वये शासनाने निर्देश दिले आहेत. तसेच, शासन निर्णय क्र. आरटीएस ०५२५-प्र.क्र. ६८-न.वि.-३२, दिनांक २७ जून, २०२५ प्रमाणे अधिसूचित केलेल्या लोकसेवा व अन्य बाबींचा तपशील नागरिकांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने तसा तपशील प्रसिध्द करणेबाबत मा. उप आयुक्त, न.प. प्रशासन संचालनालय यांचेकडील परिपत्रक न.प.प्रस.-का ०८-DUTD-RTS-२०२३-५६६२, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ वरील परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे. या अनुषंगाने चिखली, नगर परिषद चिखली, जिल्हा बुलढाणा, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवाबाबतचे तपशील दर्शविणारे विवरणपत्र यासोबत जोडले असून सदर विवरणपत्र पुढीलप्रमाणे आहे.—

**परिशिष्ट**

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्र | सेवा शुल्क रु. (फी) | नियतकाल मर्यादा | पदनिर्देशक अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | मृत्यु प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३ | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तव्याचा पुरावा<br>३. वयाचा पुरावा<br>४. विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५. ९० दिवसानंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (संबंधित विभाग प्रमुख) | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४ | झोन दाखला | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे उतारा | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५ | भाग नकाशा देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३. मोजणी नकाशा/सिटी सर्व्हे उतारा | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६ | बांधकाम परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. वास्तुविशारदाचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे<br>४. बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५. मोजणी नकाशा<br>६. मंजूर रेखांकनाची प्रत | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ७ | जोते प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | नगर रचनाकार रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ८ | भोगवटा प्रमाणपत्र | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३. जोते प्रमाणपत्र<br>४. घरमालक/वास्तुविशारद यांचे पूर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३० दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | नव्याने कर आकारणी | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. भोगवटा प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १० | पुनःकर आकारणी | विहीत नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ११ | कराची मागणी पत्र तयार करणे | विहीत नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १२ | कर माफी मिळणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १३ | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | विहीत नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १४ | मालमत्ता कर उतारा | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १५ | रहिवास नसलेल्या मालमत्ता करात सूट मिळणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १६ | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत/बक्षिस पत्र/ वाटणीपत्र व इतर) | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| | ब) वारसा हक्काने हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वारसा हक्क प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १७ | स्वयंमुल्यांकन | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १८ | आक्षेप नोंदविणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| १९ | उप विभागामध्ये मालमत्ता विभाजन | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. मालकी हक्काची कागदपत्रे (खरेदी खत, वाटणी पत्र, बक्षीस पत्र इत्यादी) | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | मालमत्ता पाडणे व पुन:र्बांधणी कर आकारणी | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कर अधिकारी | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २१ | नवीन नळ जोडणी | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २२ | मालकी हक्कात बदल करणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. मालकी हक्क कागदपत्रे<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २३ | नळ जोडणी आकारामध्ये बदल करणे | १. विहीत नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २४ | तात्पुरते/ कायमस्वरूपी नळजोडणी खंडीत करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २५ | पुन:जोडणी करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २६ | वापरामध्ये बदल करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २७ | पाणी देयक तयार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २८ | प्लंबर परवाना | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| २९ | प्लंबर परवाना नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | थकबाकी नसल्याचा दाखला | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३१ | नादुरुस्त मीटर तक्रार करणे | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३२ | अनधिकृत नळ जोडणी तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३३ | पाण्याची दबाव क्षमता तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३४ | पाण्याची गुणवत्ता तक्रार | विहित नमुन्यातील अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ३ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३५ | जलनिस्सारण जोडणी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. जागा मालकी कागदपत्रे<br>३. थकबाकी नसल्याचा दाखला | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | पाणी पुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३६ | व्यापार/व्यवसाय/साठा करण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र | योग्य प्रकारे भरलेला अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३७ | मंडपासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. रस्ता पुनर्स्थापन करार | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३८ | नवीन परवाना मिळणे | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ३९ | परवान्याचे नुतनीकरण | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४० | परवाना हस्तांतरण | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४१ | परवाना दुय्यम प्रत | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४२ | व्यवसायाचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४३ | व्यवसाय बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४४ | परवाना/धारक भागीदाराचे नाव बदलणे | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४५ | भागीदारांच्या संख्येत बदल (वाढ/कमी) | योग्य प्रकारे भरलेला अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४६ | परवाना रद्द करणे | योग्य प्रकारे भरलेला अर्ज | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४७ | कालबाह्य परवान्यासाठी नुतनीकरण सूचना | १. योग्य प्रकारे भरलेला अर्ज<br>२. कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४८ | जाहिरात परवाना/ आकाशचिन्ह परवाना, (Signange License) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प/न.पं.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | जाहिरात विभाग प्रमुख | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ४९ | सिनेमा चित्रीकरण परवाना, (Movie shooting License) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प/न.पं.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | जाहिरात विभाग प्रमुख | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५० | व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण (ऑटो-रिन्युअल) (Auto- renewal of Trade License) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प/न.पं.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १० दिवस | मिळकत पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५१ | मोबाईल टॉवर परवाना (Mobile Tower Approval) Ground Base Tower & Roff Top Tower) | १. विहित नमुन्यातील अर्ज | शासनाने विहीत केलेले व नगर परिषद /नगर पंचायत स्तरावर निश्चित केलेले दर | ६० दिवस | नगर रचनाकार | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २. माहिती तंत्रज्ञान विभाग यांनी दिलेला परवाना<br>३. संबंधित इमारतीच्या मालकी हक्काचा पुरावा<br>४. वैध भाडे करारनामा<br>५. स्थळाचा नकाशा (१:१०००)<br>६. ज्या इमारतीवर टॉवर उभारायचा आहे त्याचा वैध भोगवटा प्रमाणपत्र<br>७. संबंधित इमारतीच्या/जमिनीच्या मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र<br>८. सक्षम प्राधिकाऱ्याचे अग्निशमन ना-हरकत दाखला<br>९. सक्षम प्राधिकाऱ्याचा संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र<br>१०. पर्यावरण विभागाची ना-हरकत<br>११. संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-देय प्रमाणपत्र<br>१२. शासन वेळोवेळी निश्चित करेल असे इतर आवश्यक परवाने/दस्तऐवज | | | | | |
| ५२ | रस्ता खोदाई परवाना देणे (To Grant road Cutting permission) नवीन परवाना व नुतनीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प./न.पं. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. शासना व्दारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | नगर अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५३ | राज्याचा खाद्य परवान्याकरीता नागरिक स्वराज्य संस्थांचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे (To issue NOC from Muncipality or | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित नगरपालिकेची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/कारखाना | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १२ दिवस | कनिष्ठ अभियंता, पाणी पुरवठा जलनिःसारण व स्वच्छता (शहर स्वच्छता विभाग) | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | other Local body for state License for food Business) | होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | | | | | |
| ५४ | खाद्य नोंदणी प्रमाण-पत्राकरीता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे आरोग्यविषयक ना-हरकत प्रमाणपत्र देणे (To issue Health NOC by Municipality / Panchayat for Food Registration Certificate) | १. विहित नमुन्यातील अर्ज २. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्का-बाबतची कागदपत्रे ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले शुल्क ` | १२ दिवस | स्वच्छता निरीक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५५ | पाणी उपसा करणेसाठी केंद्रीय भूजल सर्वेक्षण विभाग (अथवा इतर संबंधित विभाग) यांचे ना-हरकत प्रमाणपात्रा-करिता नागरी स्थानील स्वराज्य संस्थेचे पाणी अनुपलब्धता प्रमाणपत्र देणे (Issue Certificate of non-availability of water from water supply agency required for NOC for water) | १. विहित नमुन्यातील अर्ज २. संबंधित न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र ३. ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र घेणेबाबतचे व पर्जन्य जल पुनर्भरण करणेबाबतचे प्रतिज्ञापत्र ४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले शुल्क ` | ३० दिवस | पाणीपुरवठा अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ५६ | लॉजिंग हाऊस परवाना देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज २. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सुचना नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | ३० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाचे जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५७ | लॉजिंग हाऊस परवान्याचे नुतनीकरण करणे | १. विहित नमुन्यातील अर्ज २. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सुचना नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | १५ दिवस | मुख्याधिकारी | संबंधित जिल्हाचे जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |

**परिशिष्ट**-चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५८ | मंगल कार्यालय/सभागृह वगैरे परवाना देणे (मिळकत विभाग) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सुचना नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | १५ दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ५९ | मंगल कार्यालय/सभागृह वगैरे परवान्याचे नुतनीकरण करणे (मिळकत विभाग) | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सुचना नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | १५ दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६० | फेरीवाले नोंदणी प्रमाणपत्र देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | शासनाचे सुचना नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | १५ दिवस | मुख्याधिकारी | जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) | विभागीय सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) |
| ६१ | भूमीगत दूरसंचार वाहिनी (ऑप्टीकल फायबर केबल) टाकण्याकरीता परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/C.R.२४२/UD-२०, दिनांक १९/१२/२०२२ मधील Schedule III नुसार आवश्यक कागदपत्रे<br>३. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | २. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/C.R.२४२/ UD-२०, दिनांक १९/१२/२०२२ मधील Schedule IV नुसार स्थानिक स्तरावर निश्चित केलेले शुल्क | शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२१/ C.R.२४२/UD-२०, दिनांक १९/१२/२०२२ मधील तरतुदी नुसार ६० दिवस | मुख्याधिकारी | जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय दूरसंचार समिती | प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग व अध्यक्ष, राज्यस्तरीय दूर संचार समिती |
| ६२ | महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार वृक्ष तोड परवानगी देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. शासन वेळोवेळी विहित करील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ४५ दिवस | उद्यान पर्यवेक्षक प्रमुख | उप मुख्याधिकारी | संबंधित नियोजन प्राधिकरणाकडील वृक्ष प्राधिकरण |
| ६३ | रस्त्यावरील खड्डे बुजविणे | १. पुराव्यासह अर्ज उदा. जीओ टॅग केलेले फोटो इत्यादी | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | नगर अभियंता | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६४ | गटारावरील झाकणे सुस्थित ठेवणे | १. पुराव्यासह अर्ज उदा. जीओ टॅग केलेले फोटो इत्यादी | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ५ दिवस | कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा जलनिःसारण (पाणी पुरवठा विभाग) | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

## परिशिष्ट

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६५ | शहरात स्वच्छता ठेवणे | १. पुराव्यासह अर्ज उदा. जीओ टॅग केलेले फोटो इत्यादी<br>२. शासनव्दारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १ दिवस | कनिष्ठ अभियंता पाणी पुरवठा जलनिःसारण (शहर स्वच्छता विभाग) | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६६ | अग्निशमन नाहरकत दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४. कॅपिटेशन फी | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | ७ दिवस | अग्निशमन पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |
| ६७ | अग्निशमन अंतिम नाहरकत दाखला देणे | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. थकबाकी नसल्याचा दाखला<br>३. वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४. अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र<br>५. लायसन्स एजन्सी यांचे नमुना-अ प्रमाणपत्र<br>६. विकासक / सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १ दिवस | अग्निशमन पर्यवेक्षक | उप मुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**टीप** :- उक्त सर्व सेवांच्या कालमर्यादा व दस्तऐवज यांच्यामध्ये शासनाव्दारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांनुसार बदल होऊ शकतो.

**प्रशांत बिडगर,**
प्रशासक तथा मुख्याधिकारी ,
नगर परिषद, चिखली.

चिखली :
दिनांक ३ जुलै, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.